**08.10.2024** प्रभातःमुरली ओम शांती बापदादा मधुबन

"गोड मुलांनो - बुद्धीला रिफाइन (स्वच्छ) बनवायचे असेल तर एका बाबांच्या आठवणीमध्ये रहा, आठवणीद्वारेच आत्मा स्वच्छ बनत जाईल"

प्रश्नः- वर्तमानसमयी मनुष्य आपला वेळ आणि पैसा कशाप्रकारे वाया घालवत आहे?

उत्तरः- जेव्हा कोणी शरीर सोडते तर त्यांच्या मागे किती पैसे इत्यादी खर्च करत राहतात. जर शरीर सोडून निघून गेला आहे तर मग त्याची काही किंमतच राहिलेली नाही, त्यामुळे त्याच्यासाठी जे काही करतात त्यामध्ये आपला वेळ आणि पैसा वायाच घालवतात.

ओम् शांती. रुहानी बाबा बसून रुहानी मुलांना समजावून सांगत आहेत, हे (ब्रह्मा बाबा) देखील असे म्हणतात ना, मग बाबा बोलत आहेत का दादा. दादा देखील म्हणतील - 'रुहानी बाबा तुम्हा मुलांना हे पास्ट, प्रेझेंट, फ्युचरचे (भूत, वर्तमान, भविष्याचे) नॉलेज ऐकवत आहेत'. वास्तविक सतयुगा पासून त्रेताच्या अंतापर्यंत काय-काय घडले, ही आहे मुख्य गोष्ट. बाकी द्वापर-कलियुगामध्ये कोण-कोण आले, काय झाले, त्याचा इतिहास-भूगोल तर भरपूर मोठा आहे. सतयुग-त्रेताचा कोणताही इतिहास-भूगोल नाहीये, इतर सर्वांचा मात्र इतिहास-भूगोल आहे, आणि देवी-देवतांना लाखो वर्षे मागे घेऊन गेले आहेत. हा आहे बेहदचा अडाणीपणा. तुम्ही देखील बेहदचे अडाणी होता. आता थोडे-थोडे समजत आहात. काहींना तर अजूनही काहीच समजत नाही. बरेच काही समजून घ्यायचे आहे. बाबांनी आबूच्या महिमेबद्दल समजावून सांगितले आहे, यावर विचार केला पाहिजे. तुमच्या बुद्धीमध्ये यायला हवे तुम्ही इथे बसला आहात. तुमचे यादगार दिलवाला मंदिर कधी बनले आहे, किती वर्षानंतर बनले आहे. म्हणतात १२५० वर्षे झाली आहेत, तर बाकी किती वर्षे राहिली? ३७५० वर्षे राहिली. तर त्यांनी (दुनियावाल्यांनी) देखील आताचे यादगार आणि वैकुंठाचे यादगार बनविले आहे. मंदिरांची देखील कॉम्पिटिशन होते ना. एकापेक्षा एक चांगले बनवतील. आता तर पैसाच कुठे आहे जे बनवतील. पैसा तर अमाप होता, तेव्हाच तर सोमनाथाचे मंदिर किती भव्य बनवले आहे. आता तर असे बनवू शकणार नाहीत. भले आग्रा इत्यादी ठिकाणी बनवत राहतात परंतु ते सारे व्यर्थ आहे. मनुष्य तर अंधारामध्ये आहेत ना. जोपर्यंत बनवतील तोपर्यंत विनाश सुद्धा येईल. या गोष्टी कोणीही जाणत नाहीत. तोडत राहतात आणि बांधत राहतात. फुकटचे पैसे गोळा होत राहतात. सर्व वाया जात राहते. वेस्ट ऑफ टाइम, वेस्ट ऑफ मनी, वेस्ट ऑफ एनर्जी. कोणाचा मृत्यू झाला तर किती वेळ वाया घालवतात. आपण मात्र असे काहीच करत नाही. आत्मा तर निघून गेली, बाकी खाल (शरीर) काय कामाचे. साप कात टाकतो, त्याची काही किंमत असते का? काहीच नाही. भक्ती मार्गामध्ये शरीराची किंमत आहे. जड चित्रांची किती पूजा करतात. परंतु ते केव्हा आले, कसे आले, काहीच माहिती नाही. याला म्हटले जाते भूत पूजा. पाच तत्वांची पूजा करतात. समजा हे लक्ष्मी-नारायण स्वर्गामध्ये राज्य करत होते, ठीक आहे, वयाची १५० वर्षे पूर्ण झाली, शरीर सोडले, बस्स. शरीर तर काही कामाचे राहिले नाही. त्यांची तिथे काय किंमत असणार. आत्मा निघून गेली, शरीर चांडाळाच्या हाती सोपवले, ते चाली-रीतीप्रमाणे जाळून टाकतील. असे नाही त्यांचे नाव होण्यासाठी त्यांची रक्षा घेऊन सर्वत्र टाकतील. काहीच नाही. इथे तर किती करतात. ब्राह्मण खाऊ घालतात, काय-काय करतात. तिथे हे काहीच असत नाही. शरीर तर काही कामाचे राहिलेले नाही. शरीराला जाळून टाकतात. बाकी चित्र राहतात. तेही अचूक चित्र मिळू शकत नाही. हि आदि देवाची दगडाची मूर्ती काही ॲक्युरेट थोडीच आहे. पूजा जेव्हापासून सुरु केली आहे तेव्हाची ती दगडाची मूर्ती आहे. खरा जो होता तो तर जळून नष्ट झाला ना, मग भक्तीमार्गात तो उदयास आला आहे. या गोष्टींवर सुद्धा विचार तर चालतो ना. आबूच्या महिमेला चांगल्या प्रकारे सिद्ध करायचे आहे. तुम्ही देखील इथे बसले आहात. इथेच बाबा साऱ्या विश्वाला नरकापासून स्वर्ग बनवत आहेत तर हेच सर्वात उच्च ते उच्च तीर्थ झाले. आता या स्थानाविषयी इतकी भावना नाही आहे फक्त एका 'शिव'मध्येच भावना आहे; कुठेही जा शिवाचे मंदिर नक्की असेल. अमरनाथमध्ये देखील शिवाचेच आहे. म्हणतात शंकराने पार्वतीला कथा ऐकवली. तिथे तर कथेची गोष्टच नाही. मनुष्यांना काहीच समज नाही आहे. आता तुम्हाला समज आली आहे, आधी माहित होते का?

आता बाबा आबूची किती महिमा करतात. सर्व तीर्थक्षेत्रांमध्ये हे महान तीर्थक्षेत्र आहे. बाबा समजावून तर खूप सांगतात, परंतु अनन्य मुलांच्या बुद्धीमध्ये बसेल तेव्हा, आता तर देह-अभिमान खूप आहे. ज्ञान तर खूप जास्त पाहिजे. खूप रिफाइननेस (शुद्धता) यायची आहे. आता तर योग मोठ्या मुश्किलीने कोणाचा लागतो. योगा सोबत मग ज्ञान देखील हवे. असे नाही फक्त योगामध्येच रहायचे आहे. योगामध्ये नॉलेज जरूर पाहिजे. दिल्लीमध्ये 'ज्ञान-विज्ञान भवन' नाव ठेवले आहे परंतु याचा अर्थ काय आहे, हे समजतात थोडेच. ज्ञान-विज्ञान तर सेकंदाचे आहे. शांतीधाम, सुखधाम. परंतु मनुष्यांमध्ये जराही बुद्धी नाही आहे. अर्थ थोडाच समजतात. चिन्मयानंद इत्यादी किती मोठे-मोठे संन्यासी आहेत, गीता ऐकवतात, त्यांचे किती ढिगांनी फॉलोअर्स आहेत. सर्वात मोठा 'जगत्'चा गुरु तर एक बाबाच आहेत. पिता आणि टीचर पेक्षा मोठा (pause घेणे) गुरु असतो. पत्नी कधीही दुसरा पती करत नाही तर गुरु देखील दुसरा करू नये. एक गुरु केला, त्यांनेच सद्गती करायची आहे मग आणखी गुरु कशासाठी? सद्गुरु तर एक बेहदचे बाबाच आहेत. सर्वांची सद्गती करणारे आहेत. परंतु असे बरेच आहेत जे या गोष्टी तर अजिबात समजत नाहीत. बाबांनी समजावून सांगितले आहे - ही राजधानी स्थापन होत आहे, मग नंबरवार तर असतील ना. कोणी तर जरा देखील समजू शकत नाहीत. ड्रामामध्ये पार्टच असा आहे. शिक्षक तर समजू शकतात. ज्या शरीराद्वारे समजावून सांगतात त्यांना (ब्रह्मा बाबांना) देखील कळत असेल. हे तर, 'गुड़ जाने, गुड़ कि गोथरी जाने'. गूळ शिवबाबांना म्हटले जाते, ते सर्वांच्या अवस्थेला जाणतात. प्रत्येकाच्या अभ्यासावरून समजू शकतात - कोण कसे शिकतात, किती सेवा करतात. बाबांच्या सेवेमध्ये किती जीवन सफल करतात. असे नाही या ब्रह्माने घरदार सोडले आहे म्हणून लक्ष्मी-नारायण बनतात. परिश्रम करतात ना. हे नॉलेज अति श्रेष्ठ आहे. कोणी जर बाबांची अवज्ञा केली तर एकदम दगडच बनतात. बाबांनी समजावून सांगितले होते - ही इंद्रसभा आहे. शिवबाबा ज्ञान वर्षा करतात. त्यांची अवज्ञा केली तर शास्त्रांमध्ये लिहिले आहे - पत्थरबुद्धी बनले म्हणून बाबा सर्वांसाठी लिहित राहतात. कोणालाही सोबत आणताना सांभाळून (पारखून) घेऊन या. असे नाही, विकारी अपवित्र इथे येऊन बसतील. नाही तर मग घेऊन येणाऱ्या ब्राह्मणीवर दोष लागतो. असे कोणाला घेऊन यायचे नाही. मोठी जबाबदारी आहे. अति उच्च ते उच्च बाबा आहेत. तुम्हाला विश्वाची बादशाही देतात तर त्यांचा किती आदर केला पाहिजे. अनेकांना मित्र-नातेवाईकांची आठवण येते, बाबांची आठवण नाही आहे. आतल्या आत गुदमरत राहतात. बाबा समजावून सांगत आहेत - 'ही आहे आसुरी दुनिया. आता दैवी दुनिया बनत आहे'; आपले एम ऑब्जेक्ट हे आहे. असे लक्ष्मी-नारायण बनायचे आहे. जी काही चित्र आहेत, सर्वांच्या बायोग्राफीला तुम्ही जाणता. लोकांना समजावून सांगण्यासाठी किती मेहनत घेतली जाते. तुम्ही देखील समजत असाल - हा थोडा चांगला बुध्दीवान आहे, हे तर काहीच समजत नाहीत. तुम्हा मुलांमध्ये ज्यांनी जितके ज्ञान धारण केले आहे, त्यानुसारच सेवा करत आहेत. मुख्य गोष्ट आहेच गीतेच्या भगवंताची. सूर्यवंशी देवी-देवतांचे हे एकच शास्त्र आहे. वेगवेगळे नाही आहे. ब्राह्मणांचे देखील काही वेगळे नाही आहे. या व्यवस्थित समजून घेण्यासारख्या गोष्टी आहेत. या ज्ञानमार्गामध्ये देखील चालता-चालता जर विकारामध्ये गेलात, तर ज्ञान वाहून जाईल. चांगले-चांगले बरेचजण जाऊन विकारी बनले तर पत्थरबुद्धी झाले. यामध्ये चांगली समज पाहिजे. बाबा जे समजावून सांगतात त्याचे मनन चिंतन केले पाहिजे. इथे तर तुम्हाला फार सोपे आहे, कोणतेही लौकिक कामकाज, गडबड-गोंधळ इत्यादी नाही. बाहेर राहिल्याने धंदा इत्यादीची किती चिंता असते. माया खूप वादळांमध्ये घेऊन येते. इथे तर एकांतच एकांत आहे. बाबा तरीही मुलांकडून पुरुषार्थ करवून घेत राहतात. हे ब्रह्मा बाबा देखील पुरुषार्थी आहेत. पुरुषार्थ करून घेणारे तर शिवबाबा आहेत. यामध्ये विचार सागर मंथन करावे लागते. इथे तर बाबा मुलांच्या सोबत बसले आहेत. जे संपूर्ण बोट देतात त्यांनाच सेवायोग्य म्हणणार. बाकी घुसमटत राहणारे (गोंधळून गेलेले) तर नुकसान करतात अजूनच डिससर्विस करतात, विघ्न आणतात. हे तर जाणता - महाराजा-महाराणी बनणार तर त्यांच्या दास-दासी देखील पाहिजेत. ते देखील इथलेच येतील. सर्व काही अभ्यासावर अवलंबून आहे. या शरीराला देखील आंनदाने सोडायचे आहे, दुःखाची गोष्ट नाही. पुरुषार्थासाठी वेळ तर मिळालेला आहे. ज्ञान सेकंदाचे आहे, बुद्धीमध्ये आहे शिवबाबांकडून वारसा मिळतो. थोडे जरी ज्ञान ऐकले, शिवबाबांची आठवण केली तरीदेखील येऊ शकतात. प्रजा तर खूप बनणार आहे, आपली सूर्यवंशी-चंद्रवंशी राजधानी इथे स्थापन होत आहे. बाबांचे बनून जर निंदा करतात तर खूप पाप चढते. एकदम जणू रसातळाला जातात. बाबांनी समजावून सांगितले आहे जे स्वतःची पूजा करवून घेतात ते पूज्य कसे म्हटले जाऊ शकतात. सर्वांचा सद्गती दाता, कल्याण करणारे तर एक बाबाच आहेत. मनुष्य तर शांतीचा अर्थ देखील समजत नाहीत. हठयोगाने प्राणायाम इत्यादी चढविणे, त्यालाच शांती समजतात. त्यासाठी देखील खूप मेहनत करावी लागते, कोणाचे तर डोकेच फिरते. प्राप्ती तर काहीच नाही. ती आहेच अल्पकाळाची शांती. जसे सुखाला अल्पकालीन काग

विष्ठा समान म्हणतात, तशी ती शांती देखील काग विष्ठे समान आहे. ती आहेच अल्पकाळासाठी. बाबा तर २१ जन्मांसाठी तुम्हाला सुख-शांती दोन्ही देतात. काहीजण तर शांतीधाममध्ये शेवटपर्यंत राहत असतील. ज्यांचा पार्ट आहे, ते इतके सुख थोडेच पाहू शकणार. तिथे देखील नंबरवार पदे तर असतील ना. भले दास-दासी असतील परंतु आतमध्ये थोडेच जाऊ शकतील. श्रीकृष्णाला देखील पाहू शकणार नाहीत. सर्वांचे वेगवेगळे महाल असतील ना. बघण्यासाठी कोणती तरी वेळ असेल. जसे बघा पोप येतात तर त्यांचे दर्शन करण्यासाठी किती लोक जातात. असे बरेच निघतील, ज्यांचा खूप प्रभाव असेल. लाखो मनुष्य दर्शन करण्यासाठी जातील. इथे शिवबाबांचे दर्शन कसे होईल? हि तर समजून घेण्याची गोष्ट आहे.

आता दुनियेला कसे माहित होईल कि हे सर्वात महान तीर्थ आहे. दिलवाला सारखे मंदिर कदाचित अजूनही आजूबाजूला एखादे असेल, ते देखील जाऊन बघायला हवे. कसे बनले आहे. त्यांना ज्ञान देण्याची सुद्धा गरज नाही. ते मग तुम्हालाच ज्ञान देऊ लागतील. सल्ला देतात ना - हे करायला हवे, हे करायला हवे. हे तर जाणतही नाहीत कि यांना शिकविणारे कोण आहेत. एकेकाला समजावून सांगण्यासाठी खूप मेहनत करावी लागते. त्यावर कथा देखील आहेत. म्हणत होते- ‘ वाघ आला, वाघ आला…’ तुम्ही देखील म्हणता - ‘मृत्यू आला कि आला’, तर ते विश्वास करत नाहीत. समजतात अजून तर ४० हजार वर्षे पडली आहेत, मृत्यू कुठून येणार? परंतु मरण तर जरूर येणार आहे, सर्वांना घेऊन जाणार. तिथे कोणताही कचरा असत नाही. इथल्या गायीत आणि तिथल्या गायीमध्ये देखील किती फरक आहे. श्रीकृष्ण थोडाच गायींना चरवत होता. त्यांच्याकडे दूध तर हेलिकॉप्टरमधून येत असेल. ही गोठ्यातील घाण दूर कुठेतरी असेल. घरासमोर थोडीच अशी घाण असेल. तिथे तर अपार सुख आहे, ज्याच्यासाठी पूर्ण पुरुषार्थ करायचा आहे. किती चांगली-चांगली मुले सेंटरवर येतात. बाबा बघून किती खुश होतात. नंबरवार पुरुषार्थानुसार फूले निघतात. जे फूल आहेत ते स्वतःला देखील फुल समजतात. दिल्लीमध्ये देखील मुले किती दिवस-रात्र सेवा करतात. ज्ञान देखील किती उच्च आहे. या आधी तर तुम्ही काहीच जाणत नव्हते. आता किती मेहनत करावी लागते. बाबांकडे तर सर्व समाचार येतात. कोणाचा ऐकवतात कोणाचा नाही ऐकवत कारण ट्रेटर (विद्रोही) देखील बरेच असतात. चांगले फर्स्ट-क्लास असणारे सुद्धा ट्रेटर्स बनतात. थर्ड-क्लासवाले देखील ट्रेटर आहेत. थोडेसे ज्ञान मिळाले तर समजतात आम्ही शिवबाबांचे देखील बाप बनलो. ओळख तर नाही आहे की नॉलेज कोण देत आहेत. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) विश्वाची बादशाही देणाऱ्या बाबांचा अतिशय आदर ठेवायचा आहे. बाबांच्या सेवेमध्ये आपले जीवन सफल करायचे आहे. पूर्णपणे अभ्यासावर लक्ष द्यायचे आहे.
2. २) बाबांकडून जे ज्ञान मिळते त्यावर विचार सागर मंथन करायचे आहे. कधीही विघ्न रूप बनायचे नाही. डिस-सर्व्हिस करायची नाही. अहंकारामध्ये यायचे नाही.

वरदान:- चारही विषयांमध्ये बाबांच्या आवडीचे मार्क्स घेणारे दिलतख्तनशीन भव

जी मुले चारही विषयांमध्ये चांगले मार्क्स घेतात, सुरुवाती पासून शेवट पर्यंत चांगल्या नंबराने पास होतात त्यांनाच पास विथ ऑनर म्हटले जाते. मधे-मधे मार्क्स कमी झाले परत भरून काढले असे नाही, परंतु सर्व विषयांमध्ये बाबांचे दिलपसंत असणारेच दिलतख्तनशीन बनतात. त्याच सोबत ब्राह्मण संसारामध्ये सर्वांचे प्रिय, सर्वांचे सहयोगी, सर्वांचा सन्मान प्राप्त करणारे दिलतख्तनशीन सो राज्य तख्तनशीन बनतात.

बोधवाक्य:- दिलरुबा ती आहे जिच्या हृदयामध्ये सदैव हेच अनहद गीत वाजत राहील की - ‘मी बाबांची, बाबा माझे’.

||| ओम शांती |||